**ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार**

**- शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणस् संस्था, कोल्हापूर संचालित

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर**

**(अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

**राज्यशास्त्र विभाग**

**प्रकल्पाचे नाव**

# "वसगडे गावच्या सामाजिक,आर्थिक आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास"

समुदाय प्रतिबद्धता कार्यक्रम अंतर्गत सादर
(Community Engagement Programme)

**सन २०२३-२४**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते, कि प्रतिमा राहुल पाटील ,अनुश्री आनंदराव गलगे ,धनश्री संतोष शिंगे , गंगा गौतम रंधील ,वैषणवी विनोद बनकर ,श्रावणी कृष्णात अडसूळ ,आदित्य नितीन कदम ,नेहा राजेश गायकवाड ,क्षितिज विजय कांबळे ,गायत्री जयवंत वारके ,अश्विनी बाजीराव पाटील, सिद्धी शिवाजी मोरबाळे , हर्षवर्धन राजाराम पाटील , सई शिवाजी कांबळे या बी. ए. भाग एक मधील विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र विषयांतर्गत सादर केलेला प्रकल्प अहवाल **"वसगडे गावच्या सामाजिक,आर्थिक आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास"** हा आमच्या पर्यवेक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. माझ्या माहिती प्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर केला गेलेला नाही.

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक: २ एप्रिल, २०२४

प्रा. दत्ता जाधव
मार्गदर्शक

प्रा. समीक्षा फराकटे
विभाग प्रमुख

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते, कि प्रतिमा राहुल पाटील ,अनुश्री आनंदराव गलगे ,धनश्री संतोष शिंगे , गंगा गौतम रंधील ,वैषणवी विनोद बनकर ,श्रावणी कृष्णात अडसूळ ,आदित्य नितीन कदम ,नेहा राजेश गायकवाड ,क्षितिज विजय कांबळे ,गायत्री जयवंत वारके ,अश्विनी बाजीराव पाटील, सिद्धी शिवाजी मोरबाळे , हर्षवर्धन राजाराम पाटील , सई शिवाजी कांबळे या बी. ए. भाग एक मधील विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र विषयांतर्गत सादर केलेला प्रकल्प अहवाल **"वसगडे गावच्या सामाजिक,आर्थिक आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास"** हा आमच्या पर्यवेक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. माझ्या माहिती प्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर केला गेलेला नाही.

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक:

**प्रा. दत्ता जाधव**
**मार्गदर्शक**

**प्रा. समीक्षा फराकटे**
**विभाग प्रमुख**

**डॉ. आर. आर. कुंभार**

## ऋणनिर्देश

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर संचलित विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकारप्रदात्त स्वायत्त) राज्यशास्त्र  विभाग अंतर्गत सदरचा प्रकल्प अहवाल सादर केला आहे. सदर अभ्यास प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आम्हाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर आर कुंभार सर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. समीक्षा फराकटे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले तसेच मौजे वसगडे  गावचे लोक नियुक्त सरपंच सौ. योगिता बागडी  व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. त्यामुळे आम्ही हा प्रकल्प अहवाल वेळेत पूर्ण शकलो. या सर्वांचे मनःपूर्वक आभार !!

**ठिकाण : कोल्हापूर**

**दिनांक :**

| अ. क्र. | नाव | वर्ग | सही |
|---|---|---|---|
| १ | प्रतिमा राहुल पाटील | बी. ए. भाग १ | |
| २ | अनुश्री आनंदराव गलगे | बी. ए. भाग १ | |
| ३ | धनश्री संतोष शिंगे | बी. ए. भाग १ | |
| ४ | गंगा गौतम रंधील | बी. ए. भाग १ | |
| ५ | वैषणवी विनोद बनकर | बी. ए. भाग १ | |
| ६ | श्रावणी कृष्णात  अडसूळ | बी. ए. भाग १ | |
| ७ | आदित्य नितीन कदम | बी. ए. भाग १ | |
| ८ | नह राजेश गायकवाड | बी. ए. भाग १ | |
| ९ | क्षितिज विजय कांबळे | बी. ए. भाग १ | |
| १० | गायत्री जयवंत वारके | बी. ए. भाग १ | |
| ११ | अश्विनी बाजीराव  पाटील | बी. ए. भाग १ | |
| १२ | सिद्धी शिवाजी मोरबाळे | बी. ए. भाग १ | |
| १३ | हर्षवर्धन राजाराम पाटील | बी. ए. भाग १ | |
| १४ | समृद्धी सुनील पाटील | बी. ए. भाग १ | |
| १५ | सई  शिवाजी कांबळे | बी. ए. भाग १ | |

“वसगडे गावच्या सामाजिक,आर्थिक आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास”

## अनुक्रमणिका


| प्रकरण | | तपशील | पान नं. |
|---|---|---|---|
| **१.** | **१.०** | **प्रस्तावना आणि संशोधन पद्धत** | |
| | १.१ | प्रस्तावना | |
| | १.२ | संशोधनाचे उद्देश | |
| | १.३ | संशोधनाचे महत्व | |
| | १.४ | माहिती संकलन स्त्रोत | |
| | १.५ | संख्यात्मक तंत्राचा वापर | |
| | १.६ | संशोधन कालावधी | |
| | १.७ | नमुना निवड | |
| | १.८ | संशोधनाची मर्यादा | |
| | १.९ | प्रकरण योजना | |
| **२.** | | **संकल्पना आणि माहिती** | |
| | २.१ | प्रस्तावना | |
| | २.२ | सर्वेक्षण अहवाल बद्दल सविस्तर माहिती | |
| **३.** | | **माहितीचे विश्लेषण** | |
| | ३. १ | प्रतिसाद देणाऱ्यांची व्यक्तिगत माहिती विश्लेषण | |
| | ३.१.२ | वय विषयक | |
| | ३.१.३ | शिक्षण विषयक | |
| | ३.१.४ | लिंग विषयक | |
| | ३.१.५ | व्यवसाय विषयक | |
| | ३.१.६ | कुटुंबाचा आकार | |
| | ३.१.७ | वार्षिक उत्पन्न | |
| | ३.१.८ | ग्रामविकासाच्या योजना | |
| | ३.२ | **“वसगडे गावच्या सामाजिक,आर्थिक आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास” विश्लेषण** | |
| | | **सारांश** | |
| | | **संदर्भ** | |
| | | **फोटो गॅलरी** | |

## प्रकरण पहिले
## प्रस्तावना आणि संशोधन पद्धत

### १.१ प्रस्तावना

**"वसगडे गावच्या सामाजिक,आर्थिक आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास"** सर्वेक्षण अहवालाचा विशेष अभ्यास हा प्रकल्पाचा विषय असून संशोधनासाठी मौजे वसगडे हे गाव निवडलेले आहे.महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यात वसगडे हे गाव आहे. वसगडे गावाचे क्षेत्रफळ सुमारे ९५४.०० हेक्टर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार वसगडे गावाची एकूण लोकसंख्या ८१६५ आहे. मौजे वसगडे गावात सुमारे १७२७ कुटुंबे राहतात. एकूण पुरुष लोकसंख्या ४१७६ व महिला लोकसंख्या ३९८९ आहे.

### १.२ संशोधनाचा उद्देश

१. मौजे वसगडे गावची लोकसंसख्याशास्त्रीय माहिती संकलित करणे.
२. मौजे वसगडे गावची शिक्षण विषयक माहिती संकलित करणे.
३. मौजे वसगडे गावची आरोग्य विषयक माहिती संकलित करणे.
४. मौजे वसगडे गावची मूलभूत पायाभूत सुविधा विषयक माहिती संकलित करणे.
५. मौजे वसगडे गावत राबवल्या लेलेल्या ग्राम विकास योजनांची माहिती संकलित करणे.
६. मौजे वसगडे गावातील ग्रामस्थांच्या ग्राम विकासाबद्दलच्या अपेक्षा जाणून घेणे.

### १.३ . संशोधन महत्व

१. मौजे वसगडे गावची लोकसंसख्याशास्त्रीय माहिती समजली .
२. मौजे वसगडे गावची शिक्षण विषयक स्तर समजला .
३. मौजे वसगडे गावची आरोग्य विषयक स्थिती समजली .
४. मौजे वसगडे गावची मूलभूत पायाभूत सुविधा विषयक माहिती समजली.
५. मौजे वसगडे गावत राबवल्या लेलेल्या ग्राम विकास योजनांची माहितीचे ज्ञान झाले.
६. मौजे वसगडे गावातील ग्रामस्थांच्या ग्राम विकासाबद्दलच्या अपेक्षा घेता आल्या.

### १.४ माहितीचे संकलन स्त्रोत (प्राथमिक व दुय्यम स्त्रोत )

१. **प्राथमिक स्त्रोत:** निवडक ग्रामस्थांकडून प्रश्नावली भरून घेतल्या.
२. **दुय्यम स्त्रोत:** ग्रामपंचायत कार्यालयातून ग्राम विकासाच्या योजनांची माहिती घेतली.

**१.५ संख्यात्मक तंत्राचा वापर**

सदर माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी गुगल फॉर्म द्वारे माहितीचे संकलन केले. प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी EXCEL SHEET चा वापर करण्यात आला आहे.

**१.६ नमुना निवड**

मौजे वसगडे गावामध्ये १७२७ कुटुंबे राहतात. सदर संशोधनासाठी संशोधकांनी एकूण ३२ कुटुंबाची अभ्यासासाठी नमूना निवड केली आहे.

**१.७ संशोधन कालावधी**

सदर संशोधन हे कोल्हापूर जिल्हयातील करवीर तालुक्यातील मौजे वसगडे या गावात ठरलेल्या संशोधन आराखड्याप्रमाणे, संशोधन समस्याच्या अनुषंगाने माहिती संकलण हे मार्च २०२४ च्या कालावधी चे आहे

**१.८ संशोधनाची मर्यादा**

सदर संशोधन हे फक्त मौजे वसगडे गावापुरते मर्यादित असून या मध्ये विश्लेषण हे फक्त सामाजिक, आर्थिक आणि विकास प्रक्रियेशी संबंधित असणार आहे त्याच्या बरोबर माहिती संकलनाचा कालावधी हा मार्च २०२४ करीता निवडलेल्या नमुन्यांच्या प्रतिसाधावर आधारलेला आहे.

**१.८ प्रकरण योजना**

**प्रकरण पहिले :** प्रस्तावना आणि संशोधन पद्धती

**प्रकरण दुसरे :** संकल्पना आणि माहिती

**प्रकरण तिसरे:** माहितीचे विश्लेषण

**प्रकरण चौथे :** सारांश

**प्रकरण पाचवे:** संदर्भ सूची

**अनुसूची**

. प्रश्नावली

. फोटो गॅलरी

## प्रकरण दुसरे

## संकल्पना आणि माहिती

सामाजिक सर्वेक्षण पद्धति एखाद्या लोकसमाजाविषयी अथवा त्यातील विवक्षित विभागाविषयी निरीक्षण करून अथवा व्यक्ती, संस्था इ. संबंधितांकडून शक्य तितकी परिमाणात्मक व आकडेवारीच्या स्वरूपात माहिती गोळा करणे, याला 'सामाजिक सर्वेक्षण' म्हणतात आणि समाजजीवनाच्या अभ्यासाच्या या पद्धतीला 'सामाजिक सर्वेक्षण पद्धती' म्हणतात. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, सामाजिक सर्वेक्षण म्हणजे समाजजीवनाचे विशिष्ट उद्दिष्ट मनात धरुन केलेले निरीक्षण. सर्वेक्षणाची उद्दिष्टे अनेक प्रकारची असू शकतात. उदा., सरकारला ग्रामीण विभागातील शेतमजुरांच्या आर्थिक परिस्थितीविषयी माहिती हवी असते अथवा कामगार जीवनमानाचा निर्देशांक आधारण्याकरिता शहरी कामगारांच्या कौटुंबिक खर्चाचा तपशील हवा असतो. आपला माल कोणत्या स्तरातील गाहक घेतात आणि त्यांच्या आवडीनिवडी कोणत्या यांविषयी माहिती घेणे कारखानदारांना इष्ट वाटते. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचे यथार्थ स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे, याचा शोध घ्यावयाचा असतो आणि त्यात कोणते बदल कसकसे होत आहेत, याचा मागोवा घेणे आवश्यक वाटते. त्यांना आपल्या अभ्यासविषयासंबंधी सामान्य सिद्धांत बांधावयाचे असतात, बांधलेले सिद्धांत वस्तुस्थितीच्या निकषावर पडताळावयाचे असतात आणि सद्यःस्थितीच्या आधारे भविष्यकालाविषयी अंदाज करावयाचे असतात. या सर्वांसाठी सामाजिक व आर्थिक जीवनासंबंधी वास्तविक ज्ञान मिळविणे आवश्यक असते आणि हे ज्ञान सामाजिक सर्वेक्षण करूनच मिळविणे शक्य असते. सामाजिक शास्त्रांतील प्रश्न यथार्थपणे मांडण्यासाठी आणि ते सोडविण्यासाठी वस्तुस्थितीची माहिती न घेता केवळ तत्त्वमीमांसेवर विसंबून राहता येणार नाही हे उघड आहे.

सामाजिक शास्त्रांची वस्तुस्थिती जाणून घेण्याची पद्धती भौतिक विज्ञानांच्या पद्धतीहून एक प्रकारे अगदी निराळी आहे. भौतिक विज्ञानांत निरीक्षणाप्रमाणे प्रयोगालाही महत्त्वाचे स्थान आहे. (प्रयोगांचा अभिकल्प). भौतिकी व रसायनशास्त्र या प्रगत शास्त्रांची आधुनिक काळातील उभारणी बहुतांशी प्रयोगपद्धतीवर झालेली आहे. प्रयोग म्हणजे इतर सर्व कारके नियंत्रित करून एका (अथवा क्वचित एकाहून अधिक) विवक्षित कारकांच्या बदलामुळे घडणाऱ्या परिणामांचे निरीक्षण करता यावे, यासाठी मुद्दाम घडवून आणलेली घटना. समाजातील घटकाचे दैनंदिन जीवनातील व्यवहार हेच ज्यांचे अभ्यासविषय आहेत, त्या सामाजिक शास्त्रांत (काही अपवाद वगळता) या अभ्यासविषयांमुळेच प्रयोगपद्धतीला मर्यादा पडते. हवेच्या दाबासंबंधीचे शास्त्रसिद्धांत प्रयोगाने अभ्यासता येतात, परंतु कमाईत वाढ झाली तर कपडालत्त्याचा सर्व खर्च किती प्रमाणात वाढतो, याचा अभ्यास करण्यासाठी प्रयोग कोण व कसे करू शकेल ? या बाबतीत प्रयोगपद्धती उपयोगी पडणार नाही. पण वेगवेगळी

कमाई असणारी कुटुंबे कपडालत्त्यावर किती खर्च करतात याची माहिती जमवून, म्हणजेच सर्वेक्षण पद्धतीने, या प्रश्नाचा अभ्यास करता येणे शक्य आहे. घडलेल्या घटनांची संगती लावणे, तदंतर्गत प्रक्रियांविषयी एखादी उपपत्ती अथवा प्रतिकृती योजून त्याच्या साहाय्याने भविष्याविषयी अंदाज घेणे, हेच इतर शास्त्रशाखांप्रमाणे समाजशास्त्रांचेही उद्दिष्ट आहे. येथे प्रयोगपद्धती शक्य नसल्याने घडून गेलेल्या किंवा घडत असलेल्या लोकव्यवहाराचे पद्धतशीरपणे निरीक्षण करणे आवश्यक होऊन बसते. म्हणून भौतिक विज्ञानात जे महत्त्व प्रयोगपद्धतीला आहे, तेच महत्त्व सामाजिक शास्त्रांत सर्वेक्षण पद्धतीला आहे.

**सर्वेक्षणांचे प्रकार**

सामाजिक सर्वेक्षणांचे विषय सामान्यपणे पाच प्रकारचे असतात (क्वचित एका सर्वेक्षणात अनेक प्रकारचे विषयही असतात) :

(१) जनांकिकी सर्वेक्षणे : यामध्ये समाजातील घटकांविषयी (अथवा जनांविषयी) लिंग, वय, वैवाहिक स्थिती, धर्म, भाषा इ. माहिती मिळविण्याकरिता केलेली सर्वेक्षणे येतात. दर दहा वर्षांनी होणारी जनगणना हीसुद्धा सर्वेक्षणच आहे. (२) राहणीविषयक सर्वेक्षणे : लोक कोठे राहतात, कसे राहतात, कोणता उद्योग अथवा व्यवसाय करतात, त्यांची घरे,इतर सुखसोयी इ. माहिती मिळविण्याकरिता केलेली सर्वेक्षणे या प्रकारात मोडतात.

(३) व्यवहार, वर्तणूक आणि सवयी यांविषयीची सर्वेक्षणे : लोक आपली कमाई कशी खर्च करतात, रिकामा वेळ कसा घालवितात, त्यांचे परस्परसंबंध इ. या प्रकारच्या सर्वेक्षणांचे अभ्यासविषय असतात.

(४) जनसंघटनाविषयक सर्वेक्षणे : कारखाने, सहकारी संस्था, कामगार संघ,शासन, राजकीय पक्ष इ. अनेक प्रकारे जनविभाग संघटित होतात. हेही सर्वेक्षणांचे महत्त्वाचे अभ्यासविषय आहेत.

(५) मते,समज व कल्पना यांसंबंधीची सर्वेक्षणे : विकीसाठी असलेल्या वस्तूंबद्दलची गिऱ्हाइकांची मते, रेडिओवरील कार्यक्र मांसंबंधीच्या आवडीनिवडी, प्रचलित सामाजिक व राजकीय प्रश्नांविषयी मते, निवडणुकीसंबंधीचे अंदाज इ. विषयांचा या प्रकारात समावेश होतो.

सर्वेक्षणाच्या विषयाबरोबरच सर्वेक्षणासाठी लोकसमाजाचे किती घटक (घरे, कुटुंबे, व्यक्ती वा अन्य) घ्यावयाचे हेही ठरवावे लागते. या दृष्टीने पाहिल्यास सर्वेक्षणांचे तीन प्रकार मानता येतात : (१) काही सर्वेक्षणांत समाजातील सर्व संबंधित घटकांचे निरीक्षण करतात. अशा सर्वेक्षणाचे स्वरूप जनगणनेसारखे असते. (२) बहुसंख्य सर्वेक्षणांत वरीलप्रमाणे जनगणनेची पद्धती न स्वीकारता प्रतिदर्श घटक निवडून केवळ त्यांचे निरीक्षण करतात. प्रतिदर्श बहुधा संभाव्यतेच्या तत्त्वानुसार निवडतात व अशा सर्वेक्षणाला संभाव्यता प्रतिदर्श सर्वेक्षण म्हणतात. दशवार्षिक गणना सोडली तर भारतात (व इतरत्र) अलीकडच्या काळात झालेली बहुतेक सर्वेक्षणे प्रतिदर्श पद्धतीची आहेत. [⟶ प्रतिदर्श सर्वेक्षण सिद्धांत] (3) एखाद्या विषयाचा अभ्यास बऱ्याच तपशिलांत जाऊन सखोलपणे करावयाचा असतो. यासाठी घटकांची अगदी मर्यादित संख्या घेऊन त्यांचे शक्य तितके सविस्तर व तपशीलवार निरीक्षण करणे इष्ट असते. अशा सर्वेक्षणाला ( वकिली किंवा वैद्यकीय व्यवसायातील शब्द वापरुन) 'केस स्टडी' किंवा व्यक्ती-अध्ययन म्हणतात. उदा., शेतीव्यवसाय अथवा विशिष्ट कारखानदारीच्या विशेष अभ्यासासाठी मोजकेच प्रारू पिक शेतकरी अथवा कारखाने निवडून त्यांचे व्यक्ती-अध्ययन करणे ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने अधिक फायद्याचे असते.एखाद्या सर्वेक्षणात या सर्व प्रकारांचा कमशः उपयोग केलेला असतो. प्रथम सामान्य माहितीसाठी जनगणना, नंतर प्रतिदर्श निवडून त्यांचे अधिक विस्तृत सर्वेक्षण आणि शेवटी अगदी मोजक्या घटकांचा सांगोपांग विशेष अभ्यास अशा तऱ्हेने हे सर्वेक्षण चालते.

'शितावरुन भाताची परीक्षा' हे व्यवहारातील प्रतिदर्शाचे तत्त्व सर्वेक्षण पद्धतीतही फायद्याचे ठरते. प्रतिदर्श सर्वेक्षणाचा मोठा फायदा असा की, निरीक्षणासाठी घेतलेल्या घटकांची संख्या जनगणनेच्या तुलनेने खूप लहान असते. समजा, एका मोठ्या शहरातील जनतेच्या कौटुंबिक खर्चाविषयी अभ्यास करावयाचा आहे आणि शहरात एक लाख कुटुंबे आहेत. प्रतिदर्श पद्धती योग्य प्रकारे वापरली तर फक्त दोन-तीन हजार ( म्हणजे अवघी दोन-तीन टक्के ) कुटुंबांचे सर्वेक्षण करून सरासरी खर्चाविषयी विश्वसनीय अंदाज काढता येतात. म्हणून प्रतिदर्श सर्वेक्षणात जनगणनेपेक्षा वेळ, पैसा व श्रम यांची खूपच बचत होते. तसेच कामाचा व्याप बराच कमी असल्यामुळे प्रतिदर्श सर्वेक्षणात माहिती अधिक कसोशीने घेता येते. अर्थात ती जनगणनेतील माहितीपेक्षा अधिक बिनचूक व विश्वसनीय असते. प्रतिदर्श हा एकूण लोकसमुदायाचा अंशभाग; तेव्हा त्यापासून निघणारा अंदाजी आकडा व खरोखरीचा आकडा ( उदा., शहरातील सरासरी कौटुंबिक खर्च) यात तफावत ही राहणारच. परंतु संभाव्यतेच्या तत्त्वानुसार प्रतिदर्श संख्या आणि प्रतिदर्श अभिकल्प निवडून ही तफावत इष्ट प्रमाणात कमी करता येते आणि अंदाजांची परिशुद्धता वाढविता येते. इतकेच नव्हे, तर वर्तविलेल्या अंदाजांच्या अथवा अनुमानांच्या परिशुद्धतेचे मापनहीसंभाव्यता सिद्धांताच्या साहाय्याने सर्वेक्षणात मिळालेले आकडे वापरुन करता येते. सर्वेक्षणातील माहिती विश्वसनीय म्हणून अनुमानांच्या परिशुद्धतेविषयीचे हे अंदाजही विश्वसनीय असतात. उलट, जनगणनेतील माहिती तितकी विश्वसनीय नसते आणि तिच्यापासून काढलेली अनुमाने कितपत परिशुद्ध आहेत

हेही सांगता येत नाही.सामाजिक सर्वेक्षण पद्धतीचे सामान्य विवेचन येथपावेतो झाले असून आता एखादे सर्वेक्षण योजून ती पार पाडताना कोणत्या गोष्टी कोणत्या कमाने कराव्या लागतात याचे विवेचन पुढे दिले आहे.

**सर्वेक्षणाची पूर्वतयारी :** कोणत्याही मोठ्या सामाजिक सर्वेक्षणाचे प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वी बरीच पूर्वतयारी करावी लागते. प्रथम सर्वेक्षणाचे मुख्य उद्दिष्ट निश्चित करावे. नंतर त्या विषयावरील महत्त्वाचे ग्रंथ, लेख आणि त्या अथवा तत्संबंधित विषयावर पूर्वी झालेल्या सर्वेक्षणांचे वृत्तांत वाचावे. ज्यांनी पूर्वीची सर्वेक्षणे केली त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करता आल्यास संधी दवडू नये. या सर्वांची अभिप्रेत उद्दिष्टाचा तपशील व कक्षा निश्चित करण्यास मदत होते आणि प्रत्यक्ष कामातील संभाव्य अडचणी समजतात. त्यानंतर सर्वेक्षणाची व्याप्ती आणि सीमाक्षेत्र ठरवावे. सर्वेक्षणासाठी कोणता भौगोलिक अथवा शासकीय विभाग घ्यावयाचा,कोणता लोकसमुदाय घ्यावयाचा (शहरी, ग्रामीण की दोन्ही ) इ. सीमा निश्चित केल्या पाहिजेत. तसेच लोकसमुदायातील कोणत्या थरांचे सर्वेक्षण करावयाचे हे ठरविले पाहिजे. उदा., शेतमजुरांची पाहणी करावयाची असल्यास सर्वेक्षणात इतर व्यवसाय करणाऱ्यांचा समावेश होणार नाही. त्याचबरोबर निरीक्षणासाठी कोणता अंतिम घटक घ्यावयाचा हेही ठरविले पाहिजे. काही सर्वेक्षणांना घर, तर काहींना कुटुंब आणि अन्य काहींसाठी वयात आलेला प्रत्येक स्त्री-पुरुष हा अनुरू प अंतिम घटक असतो. उदा., आर्थिक कमाई हा विषय असल्यास कौटुंबिक की वैयक्तिक कमाई यावर अंतिम घटक कुटुंब की व्यक्ती हे अवलंबून राहील. पुष्कळशी सामाजिक सर्वेक्षणे कुटुंबवार सर्वेक्षणे असतात.

सर्वेक्षणात मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व विवेचन करताना कोणती वर्गीकरणे उपयोगी पडतील याचा विचार आधीच करून ठेवावा. माहितीचा उपयोग कशासाठी व्हावयाचा यावर हे अवलंबून असते. म्हणजे त्याप्रमाणे इष्ट वर्गीकरणासाठी आवश्यक असणारी माहिती सर्वेक्षणात गोळा करता येते.

बहुतेक सर्वेक्षणे प्रतिदर्श पद्धतीची असल्याने प्रतिदर्श संख्या किती घ्यावयाची हे ठरविले पाहिजे. सर्वेक्षणावरुन वर्तविलेली अनुमाने अथवा अंदाजी आकडे किती परिशुद्ध हवेत यानुसार प्रतिदर्श संख्या ठरते. उलट सर्वेक्षणासाठी वेळ, पैसा व श्रम किती लावावे लागतील, हे ठरविण्यासाठी प्रथम प्रतिदर्शसंख्या निश्चित झाली पाहिजे. सर्वेक्षणे किती दिवसांत पूर्ण करावयाची,त्यासाठी निरीक्षक, पर्यवेक्षक इ. क्षेत्र-कर्मचारी आणि कार्यालयीन कर्मचारी किती लागतील, त्याकरिता किती खर्च येईल,त्यासाठी लागणारे अनुरू प मनुष्यबळ आणि द्रव्यबळ यांची तरतूद कशी करावयाची याचा विचारही यावेळीच करतात.

कित्येकदा सर्वेक्षण प्रमुखाला सांख्यिकीचे पुरेसे ज्ञान नसते. त्याने सर्वेक्षणाच्या सुरूवातीपासूनच सर्वेक्षणपद्धती व सांख्यिकीय विश्लेषण उत्तम अवगत असलेल्या एखाद्या सांख्यिकीविज्ञाचे साहाय्य घ्यावे. असे न करता पुष्कळदा सर्वेक्षणानंतर गोळा झालेल्या माहितीचे केवळ वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीविज्ञाला पाचारण केले जाते. माहिती योग्य पद्धतीने गोळा केलेली नसल्यामुळे तिच्यापासून उपयुक्त निष्कर्ष काढणे अशक्य असते आणि बराच पैसा खर्च करून पुष्कळ परिश्रमाने मिळविलेली माहिती अखेर वाया जाण्याचा प्रसंग ओढवतो. हा धोका टाळता येण्यासारखा असतो.

सर्वेक्षणाच्या पूर्वतयारीच्या काळात आवश्यक वाटल्यास एक मार्गदर्शी सर्वेक्षण लहान प्रमाणावर घ्यावे. तिचे दोन मुख्य फायदे असतात. कोणत्या प्रश्नांस समाधानकारक उत्तरे मिळतात, कोणास मिळत नाहीत, कशात बदल करावेत, कोणते निखालस गाळावेत, कोणते नवे प्रश्न घालावेत वा दिलेल्या प्रश्नांचा कम बदलावा का, यांसंबंधी उपयुक्त अनुभव मार्गदर्शी सर्वेक्षणामुळे मिळतो आणि प्रश्नावली सुधारता येते. दुसरे, ज्यावरुन प्रतिदर्श घटक निवडावयाचे ती मूळ यादी किंवा प्रतिदर्शी व्यूह कितपत योग्य आहे, इष्ट माहितीची स्वाभाविक चलनशीलता किती, अनुत्तरितांचे प्रमाण अंदाजे किती असेल वगैरे प्रतिदर्श निवडीला आवश्यक असलेली माहिती मार्गदर्शी सर्वेक्षणावरुन मिळते. याशिवाय प्रश्नकर्त्यांना अथवा निरीक्षकांना किती प्रशिक्षण द्यावे लागेल, प्रवासासाठी व प्रत्यक्ष माहितीची नोंद करण्यासाठी किती वेळ लागतो, देखरेख कोणत्या प्रकारची व किती प्रमाणात पाहिजे वगैरे संघटनात्मक बाबी निश्चित करण्यासाठीही मार्गदर्शी सर्वेक्षणाचा फार उपयोग होतो. याच्या अनुभवाने उद्दिष्टांचे तपशील, प्रश्नावली व प्रतिदर्श अभिकल्प यांत सुधारणा करता येते आणि मुख्य सर्वेक्षणासाठी आवश्यक असलेला वेळ, खर्च,मनुष्यबळ व संघटना यांसंबंधीचे अंदाज अधिक यथार्थ होऊन प्रसंगी या सर्वांत बरीच बचत होते. म्हणून एखादी देशव्यापी अथवा मोठमोठी सामाजिक सर्वेक्षणे सुरू करताना लहान प्रमाणावर केलेली एक अथवा अनेक मार्गदर्शी सर्वेक्षणे हा पूर्वतयारीचा अत्यावश्यक भाग समजला जातो.

सर्वेक्षणातील पुढील टप्पा म्हणजे माहिती जमविण्यासाठी प्रश्नावली तयार करण्याचा होय. शहरातील वाहतूक अथवा वृत्तपत्रांची लोकप्रियता इत्यादींसाठी प्रत्यक्ष अवलोकनाने होणारी सर्वेक्षणे किंवा जन्म-मृत्यू अथवा कंपन्यांचे ताळेबंद इ. विषयांसंबंधी उपलब्ध दप्तरातील नोंदींवरून केलेली सर्वेक्षणे सोडली, तर बहुतेक आधुनिक सर्वेक्षणांत प्रश्नावली हेच माहिती मिळविण्याचे प्रमुख साधन असते. प्रश्नावली बहुधा छापील असते व तिचा उपयोग दोन प्रकारे करता येतो : (१) उत्तर देणाऱ्याला प्रश्नावली टपालाने पाठवून अथवा समक्ष देऊन भरुन देण्याची विनंती करणे आणि (२)निरीक्षकाने स्वतः प्रश्न विचारून प्रश्नावलीवर उत्तरांची नोंद करणे. पहिला प्रकार वापरावयाचा तर उत्तर देणाऱ्याला चांगल्यापैकी लिहिता-वाचता आले पाहिजे आणि प्रश्नही सहज व

निःसंदिग्धपणे समजतील असे पाहिजेत. हा प्रकार सोयीचा व बरेच वेळा कमी खर्चाचा असतो, परंतु त्याला काही मर्यादा आहेत. उदा., ज्या प्रश्नांचे उत्तर उत्स्फूर्तपणे (विचार करण्यास अवधी न घेता) मिळावे अशी अपेक्षा असेल ते प्रश्न या प्रकारात विचारता येणार नाहीत. तसेच प्रश्नाचा खुलासा न झाल्यामुळे अथवा अन्य कारणाने प्रश्न अनुत्तरित राहण्याचा, तसेच प्रश्नावलीच (परतीचे टपालहशील जोडलेले असूनही) परत न येण्याचा धोका असतो. पाश्चात्त्य देशांत पहिला प्रकार बराच रुढ झाला आहे. भारतीय सर्वेक्षणात निरीक्षक संबंधित व्यक्तीची मुलाखत घेऊन तोंडी प्रश्न विचारुन माहिती प्रश्नावलीवर लिहून घेतो. या पद्धतीत प्रश्नाचा अधिक खुलासा करता येतो; न समजल्यामुळे प्रश्न अनुत्तरित राहत नाही.

प्रश्नावली काळजीपूर्वक तयार करावी लागते. प्रश्नावलीचे वेगवेगळे खंड, प्रश्नांचा क्र म, त्यांची एकमेकांशी संगती, त्यांचे शब्द-स्वरूप, उत्तराकरिता सोडलेली जागा, काही प्रश्नांसाठी कोष्टकाच्या स्वरूपाची मांडणी वगैरेंचा नीट विचार करावा लागतो. प्रश्नावलीची छपाई स्पष्ट व सुबक असावी. काही प्रश्न ‘होय’, ‘नाही’ या स्वरूपाचे, तर काहींची पर्यायी उत्तरे छापलेली असून फक्त अभिप्रेत उत्तरावर खूण करावयाची असते; इतरांची उत्तरे लिहून घ्यावयाची असतात. प्रश्नावलीच्या आरंभीच ही सर्व माहिती खाजगी व गुप्त मानली जाईल अशी हमी स्पष्टपणे छापलेली असावी. प्रश्नाचे उत्तर असंदिग्ध येईल इतका तो स्पष्ट असावा. स्पष्टीकरणाची आवश्यकता असल्यास ते शक्यतो ठरलेल्या मोजक्या शब्दांत व ठरीव पद्धतीने द्यावे. प्रश्नावली लांब व कंटाळवाणी नसावी, कारण त्यामुळे माहितीची विश्वसनीयता कमी होते. तसेच प्रश्न स्मरणशक्तीला फार ताण देणारे नसावेत. प्रश्नावलीत वापरलेल्या कित्येक शब्दांची स्पष्ट व्याख्या करणे आवश्यक असते. कुटुंब, कुटुंबप्रमुख, कमाई,व्यवसाय इ. दिसायला सोप्या वाटणाऱ्या शब्दांतील आशय निःसंदिग्धपणे मर्यादित करणे वाटते तितके सोपे नाही हे वाचकास थोडा विचार केल्यास सहज कळून येईल. सर्व निरीक्षकांनी माहिती एकाच पद्धतीने घ्यावी. संदिग्धतेमुळे, न समजल्यामुळे, गैर अथवा भिन्न समजुतीमुळे त्यांत फरक होऊ नयेत, वेगवेगळया निरीक्षकांनी शब्दांचे वेगवेगळे अर्थ करू नयेत, म्हणून प्रश्नावलीबरोबरच शब्दांच्या व्याख्या, स्पष्टीकरणे आणि खुलासेवार लेखी सूचना तयार केल्या जाव्यात. मार्गदर्शी सर्वेक्षणातील अनुभव येथेही उपयोगी पडतो.

सर्वेक्षणातील यापुढचे काम म्हणजे क्षेत्रकार्याची व्यवस्था करणे. प्रतिदर्शातील घटकांस शोधून संबंधित व्यक्तीकडून इष्ट माहिती मिळविणे याला क्षेत्रकार्य म्हणतात आणि हे काम करणाऱ्यास क्षेत्र निरीक्षक म्हणतात. मुलाखत घेऊन माहिती नोंदविताना निरीक्षकाला अनेक पथ्ये पाळावी लागतात. दिलेली सर्व माहिती गुप्त व खाजगी समजली जाईल, ती इतर कोणालाही समजणार नाही याबद्दल उत्तर देणाऱ्या व्यक्तीला प्रथमच हमी द्यावी आणि सर्वेक्षणाचे उद्दिष्ट समजावून देऊन तिला विश्वासात घ्यावे. उत्तर देणाऱ्याच्या सोयीने व कलाने घ्यावे.

आपल्या वागणुकीमुळे तो नाराज होऊन माहिती नाकारण्याचा धोका टाळावा. त्याचबरोबर माहिती विश्वसनीय मिळेल अशी दक्षता घ्यावी. प्रश्नाचे स्पष्टीकरण देताना आपण अनवधानाने विवक्षित उत्तर सुचवीत नाही, स्वतःच्या मताचे दडपण अथवा प्रतिबिंब त्यात पडत नाही याबद्दल निरीक्षकाने खबरदारी घेतली पाहिजे.

सर्वेक्षण करावयाचे ठरविले की क्षेत्रकार्यासाठी पात्र व अनुरूप असे निरीक्षक मिळविले पाहिजेत. त्यांना पूर्वीचा अनुभव नसल्यास सर्वेक्षण पद्धतीविषयी सामान्य आणि प्रस्तुत सर्वेक्षण व तिची प्रश्नावली यांविषयी विशेष प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यांचेकडून चाचणीदाखल काही प्रश्नावली भरू न घ्याव्यात आणि यानंतर जे योग्य वाटतील त्यांनाच निरीक्षक नेमावे. जेथे सर्वेक्षणे नेहमी चालूच असतात त्या संस्थांत (उदा., भारतातील राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षणे ) काही पर्यवेक्षक व निरीक्षक कायमचे नोकरीवर असतात.

सर्वेक्षण मोठे असल्यास निरीक्षकांच्या कामावर देखरेख करण्यासाठी पर्यवेक्षक नेमावेत. कामाची दैनंदिन वाटणी करणे,निरीक्षकांच्या शंका व अडचणी दूर करणे, अपुऱ्या प्रश्नावली पूर्ण करून घेणे, काही प्रश्नावली पुन्हा स्वतः भरून काम समाधानकारक आहे याची खात्री करून घेणे इ. कामे पर्यवेक्षकांकडे असतात. पर्यवेक्षकांनी पूर्ण झालेल्या प्रश्नावली कार्यालयात ताबडतोब पाठवाव्यात. त्यामुळे पुढील कामाचा खोळंबा होत नाही. प्रत्येक निरीक्षकाने व पर्यवेक्षकाने आपापल्या कामाची दैनंदिनी ठेवावी.

प्रश्नावली कार्यालयात आल्या की त्या व्यवस्थित व पूर्ण भरल्याची तपासणी होते, अपुऱ्या प्रश्नावली क्षेत्रांत परत पाठवून पूर्ण करविल्या जातात आणि पूर्ण प्रश्नावलींचे पुढील संस्करणाच्या दृष्टीने संपादन सुरू होते. बहुतेक सर्व मोठ्या सर्वेक्षणातील माहितीचे संकलन, संक्षिप्तीकरण, कोष्टकीकरण आणि विश्लेषणासाठी आवश्यक असलेली इतर गणितकृत्ये ही सर्व संगणकाच्या साहाय्याने होतात. यासाठी काही वेळा प्रथम प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची नोंद संकेतलिपी स्वरूपात करावी लागते. नंतर या माहितीवरुन योग्य ते सॉफ्टवेअर वापरून इष्ट ती कोष्टके तयार केली जातात. सर्वेक्षणाच्या योजकाने इष्ट कोष्टकांच्या आधीच मनाशी विचार करून त्या दृष्टीने प्रश्नावलीतील प्रश्नांची योजना व मांडणी केली, तर संस्करणाचे काम तितकेच सोपे व जलद होते.

**विश्लेषण व अहवाल**

सर्वेक्षणात गोळा झालेली माहिती इष्ट त्या पद्धतीने संक्षिप्त झाली, की पुढील पायरी विश्लेषणाची असते. नियोजित उद्दिष्टाच्या दृष्टीने विविध कोष्टकांतील माहितीची सर्व बाजूं नी छाननी करणे, त्यावरू न सर्वेक्षण केलेल्या लोकसमाजाविषयी तार्किक, गुणात्मक व संख्यात्मक निष्कर्ष काढणे, त्याविषयी अंदाजे आकडे अथवा

आगणने काढणे,संबंधित गृहीतकांची परीक्षा पाहणे इ. गोष्टींचा यांत समावेश होतो. संख्यात्मक निष्कर्ष काढण्यासाठी सांख्यिकीतील अद्ययावत पद्धती वापरल्या जातात.

सर्वेक्षणातील शेवटचे काम म्हणजे अहवाल किंवा वृत्तांत लिहिणे. अहवालात सर्वेक्षणाचे उद्दिष्ट, पूर्वपीठिका व इतिहास,कोणासाठी व कोणामार्फत सर्वेक्षण झाले त्याचा तपशील, त्यासाठी उभी केलेली संघटना आणि लागलेला वेळ, प्रश्नावली,क्षेत्रकार्याचे संक्षिप्त वर्णन इ. प्रथम द्यावीत. त्यानंतर उद्दिष्टाच्या दृष्टीने गोळा झालेल्या माहितीच्या साहाय्याने त्या लोकसमाजाच्या विविध अंगांचे निरनिराळ्या भागांत वर्णन व विवेचन करावे आणि त्यापासून निघालेले निष्कर्ष व अनुमाने द्यावी. वर्णनाला व विवेचनाला आधारभूत असलेली सर्वेक्षणातून निघालेली आकडेवारी कोष्टकाच्या व आलेखांच्या रूपाने अहवालात नमूद करावीत. विवेचनाच्या सुलभतेच्या दृष्टीने मजकुरातही लहान लहान कोष्टके देणे इष्ट असते. शेवटी निष्कर्षांचा गोषवारा देऊन आणि ( अपेक्षित असल्यास ) उपाययोजनेविषयी शिफारशी देऊन अहवाल समाप्त करावा.

सामाजिक सर्वेक्षण पद्धती आता सर्वत्र सर्वमान्यता पावल्यामुळे तिचा दुरुपयोग होण्याचा धोकाही वाढला आहे. अतिउत्साही पण अनभिज्ञ व्यक्तींनी सर्वेक्षण पद्धतीचा असंबद्धपणे वापर केल्याची उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे विवेकहीन व्यक्तींनी आपल्या विवाद्य मताच्या पुष्ट्यर्थ सर्वेक्षण पद्धतीचा अतिरेकी अथवा गैरवापर केल्याची उदाहरणेही आहेत. नवे सर्वेक्षण योजताना योजकाने हा धोका लक्षात ठेवणे जरू र असते. तसेच झालेल्या सर्वेक्षणाचे अहवाल वाचताना अभ्यासकांनीही चोखंदळ आणि विवेकी दृष्टी ठेवणे आवश्यक असते. सामाजिक विज्ञानांच्या होतकरू अभ्यासकाने हेही ध्यानात घ्यावे की, समाजशास्त्रांच्या विकासाला तत्त्वमीमांसेचीही मूलभूत आवश्यकता आहे. चिंतन आणि निरीक्षण दोन्ही आवश्यक असतात. चिंतनाची उणीव निरीक्षणाने भरू न निघत नाही.

राज्यातील साधनसंपत्तीची मोजदाद ठेवण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून जगात सर्वत्र आढळते. यामधून जनगणनेस आरंभ झाला. पाश्चात्त्य देशांत सामाजिक सर्वेक्षणाला एकोणिसाव्या शतकात सुरुवात झाली. औद्योगिक क्रां तीनंतर निर्माण झालेल्या शहरांतील श्रमिक जनतेचे कष्टमय, गलिच्छ व बकाली जीवन हा सुरुवातीच्या सामाजिक सर्वेक्षणांचा मुख्य विषय असे. उद्देश अर्थातच समाजसुधारणेचा होता. प्रारंभीच्या प्रयत्नांत ल प्ले (Le Play) या फ्रेंच समाजसुधारकाने (१८५५सालच्या सुमारास) केलेल्या हजारांवर फ्रेंच कामगार कुटुंबांच्या सर्वेक्षणाचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. हा अभ्यास व्यक्ती-अध्ययन (केस स्टडी ) स्वरूपाचा होता. सुरुवातीच्या सर्वेक्षणांच्या या विशिष्ट विषयामुळे पाश्चात्त्य देशांत सामाजिक सर्वेक्षण शब्दाला दारिद्र्याचे सर्वेक्षण असा रुढार्थ प्राप्त झाला होता.

इंग्रजी सत्ता सुरू झाल्यानंतर अखिल भारतीय जनगणनेचा एक प्रयत्न १८७२ मध्ये झाला. पहिली पद्धतशीर भारतीय जनगणना १८८१ मध्ये झाली व तेव्हापासून दर दहा वर्षांनी होते. त्यापूर्वीच्या काळात काही प्रादेशिक विभागात जनगणना झाल्या होत्या. तसेच या काळात पुणे शहराचे सर्वेक्षण (१८१८–२२), कोल्हापूर संस्थानचा सांख्यिकीय अहवाल (१८४८)यांसारखे लोकसमाजाविषयी तपशीलवार माहिती मिळविण्याचे प्रयत्नही सरकारी प्रेरणेने झाले होते. यानंतरच्या काळात प्रसिद्ध झालेल्या दख्खनमधील पाटबंधाऱ्याचे परिणाम (१८५०–६०), दुष्काळ चौकशी समितीचे अहवाल (१८७६ नंतर ) वगैरे सरकारी अहवालांत भारतीय ग्रामीण लोकजीवन प्रतिबिंबित झालेले दिसते. सार्वजनिक सभेने ( पुणे ) महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीबद्दल केलेली निवेदने (१८७६–७८) ग्रामीण विभागाच्या सर्वेक्षणावर आधारलेली होती. ग्रामीण जीवनाचा सखोल अभ्यास करण्याचा पहिला पद्धतशीर प्रयत्न पुण्याच्या शेतकी कॉलेजचे एच्. बी. मान यांनी केला. त्यांनी १९१६-१७ मध्ये महाराष्ट्रातील दोन खेडेगावांचे तपशीलवार सर्वेक्षण केले. त्यानंतर तशा तऱ्हेची अनेक सर्वेक्षणे इतरत्र झाली. शेतीव्यवसायाचे पहिले पद्धतशीर सर्वेक्षण पुण्याच्या शेतकी कॉलेजचे प्रा. पाटील यांनी १९२५-२६ मध्ये केले. ⇨गोखले अर्थशास्त्र संस्थेचे प्रा. गाडगीळ यांनी याच विषयावर अधिक मोठ्या प्रमाणावर व अधिक पद्धतशीरपणे वाई तालुक्याचे सर्वेक्षण १९३६–३८ मध्ये केले. त्यापूर्वी ⇨नारायण गोविंद चापेकर यांनी बदलापूर गावाचे विस्तृत सामाजिक सर्वेक्षण करून त्याचा अहवाल बदलापूर ( आमचा गाव) या नावाने मराठीत प्रसिद्ध केला होता (१९३३).

मुंबई सरकारमार्फत १९२१–२३ मध्ये झालेल्या गिरणी कामगारांच्या कुटुंबखर्चाच्या सर्वेक्षणापासून नागरी लोकजीवनाच्या सर्वेक्षणास सुरुवात झाली असे दिसते. तत्पूर्वी लाहोर शहरातील गरीब वस्तीच्या सर्वेक्षणासारखे (१९२०) तुरळक प्रयत्न झाले असावेत. त्यानंतर सरकारमार्फत अशी सर्वेक्षणे इतर शहरांतही झाली. प्रा. गाडगीळ यांनी पुणे शहराचे १९३८ मध्ये प्रतिदर्श सर्वेक्षण केले तेव्हापासून शहरातील समग्र लोकजीवनाच्या पद्धतशीर अभ्यासास आरंभ झाला असे म्हणता येईल. यानंतर ग्रामीण व शहरी जीवनाविषयी अनेक सर्वेक्षणे झाली. कोलकात्याचे सांख्यिकीविज्ञ प्रशांतचंद्र महालनोबीस यांनी त्या प्रांतात काही सर्वेक्षणे केली. हळूहळू केंद्रीय व प्रांतीय शासनाला सामाजिक सर्वेक्षणांचे महत्त्व व आवश्यकता पटू लागली. तसेच महालनोबीस व ⇨पांडुरंग वासुदेव सुखात्मे या भारतीय सांख्यिकीविज्ञांनी प्रतिदर्श सर्वेक्षण सिद्धांतात मौलिक भर घालून प्रतिदर्श सर्वेक्षणाचे तंत्र झपाट्याने पुढे नेले.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारताने योजनाबद्ध आर्थिक विकासाची पद्धती स्वीकारली, त्यामुळे साहजिकच सामाजिक सर्वेक्षणाचे विषय वाढले, क्षेत्र विस्तारले आणि व्याप वाढला. केंद्रीय सरकारने राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण व केंद्रीय सांख्यिकीय विभाग हे स्वतंत्र विभाग स्थापून या कार्याला अधिक चालना दिली. त्याशिवाय कृषि सांख्यिकीय विभाग, केंद्र आणि राज्य सरकारांचे अन्य शासकीय विभाग, गोखले अर्थशास्त्र संस्था, इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट यांसारख्या बिनसरकारी संस्था, विश्वविद्यालये इ. अनेक संस्थांमार्फत अनेक सर्वेक्षणे झाली आहेत व होत आहेत. अखिल भारतीय स्वरूपाची जी सर्वेक्षणे झाली, त्यांपैकी महत्त्वाची तीन सर्वेक्षणे पुढीलप्रमाणे :

(१) भारतीय शेतमजूर सर्वेक्षण (१९५०-५१) केंद्रीय सरकारमार्फत झाले.

(२) रिझर्व्ह बँकेने १९५२ मध्ये ग्रामीण (पत) उधार सर्वेक्षण केले.


(३) भारतीय लोकजीवनाची अनेकविध माहिती मिळविण्याच्या हेतूने १९५०-५१ पासून राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षणास प्रारंभ झाला व त्याची एकामागून एक सत्रे सतत चालू आहेत. २००४-०५ मध्ये एकसष्टावे सत्र झाले.

**प्रकरण तिसरे**


## माहितीचे विश्लेषण


### ३.१. प्रतिसाद देणाऱ्याच्या व्यक्तिगत माहितीचे विश्लेषण

### ३.१.१. वयाचे विश्लेषण





**मौजे वसगडे**







मौजे वसगडे येतील एकूण लोकसंख्येपैकी ३६.४. % लोकसंख्या खुल्या प्रवर्गातील, २१.२ % टक्के लोकसंख्या ओ बी सी प्रवर्गातील, १२.१ % लोकसंख्या एन टी प्रवर्गातील,९.१ % प्रवर्गातील लोकसंख्या अनुसूची  जाती ची तर १८.२ %   लोकसंख्या विशेष मागास प्रवर्गाची आहे.

### ३.१.२. शिक्षणाचे  विश्लेषण




मौजे वसगडे गावातील सुमारे ३२ प्रतिसादी कुटुंबांपैकी ८.८ % कुटुंब प्रमुख पदव्युत्तर शिक्षण घेतलेले, १४.७ % कुटुंब प्रमुख पदवीधर, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले कुटुंब प्रमुख २३.३ % आहेत. माध्यमिक शिक्षण घेतलेले ३८.२ % कुटुंब प्रमुख , प्राथमिक शिक्षण घेतलेले ११.८ % कुटुंब प्रमुख आहेत.





मौजे वसगडे गावातील माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण (५८.८ %)अधिक आहे.उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण त्या खालोखाल(२०.६ %) आहे. शिक्षण न घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण नगण्य (८.८.% ) आहे.

4. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या मुलांची  संख्या
32 responses





3. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या मुलींची संख्या
32 responses




मौजे वसगडे गावातील महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलांचे आणि मुलींचे  प्रमाण(६२.५%) समान आहे.


5. व्यावसायिक शिक्षण (मेडिकल, इंजिनिअर, डिप्लोमा, आय.टी. आय. इ) घेतलेल्या व्यक्तींची संख्या
34 responses



मौजे वसगडे गावातील व्यावसायिक  शिक्षण घेणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण अत्यंत नगण्य (३२.३ %) आहे.


## ३.१.२. आरोग्याचे   विश्लेषण

1. तुम्ही कोणत्या प्रकारच्या आरोग्य केंद्राचा वापर करता?
34 responses





मौजे वसगडे गावातील एकूण लोकसंख्येपैकी खाजगी  आरोग्य केंद्राचा वापर करणाऱ्यांची संख्या ५५.९ % तर सरकारी आरोग्य केंद्रांचा वापर करणाऱ्यांची संख्या ४४.१% इतकी आहे.

3. माता काळजी (जन्मपूर्व, जन्मानंतर) यासाठी कोणत्या आरोग्यसुविधेचा वापर केला आहे?
34 responses





मौजे वसगडे गावातील एकूण लोकसंख्येपैकी प्रसूती काळात खाजगी  आरोग्य केंद्राचा वापर करणाऱ्यांची संख्या ५८.८ % तर सरकारी आरोग्य केंद्रांचा वापर करणाऱ्यांची संख्या ४१.२ % इतकी आहे.




मौजे वसगडे गावातील ७६.५ % लॉक म्हणतात की त्यांना आरोग्याची कोणतीही सुविधा भेडसावत नाही. मधुमेह,उच्च रक्तदाब आणि हृदयविकार आदि. जिनशैलीशी निगडीत समस्या केवळ ८.८% लोकाना भेडसावतात.


### ३.१.३. गावातील मूलभूत सुविधांविषयक विश्लेषण




मौजे वसगडे गावात सुमारे ८५.३ % कुटुंबांना सार्वजनिक पाण्याचा नळ उपळबद्ध आहे. पिण्याच्या पाण्याची उपलब्धतता समाधानकारक आहे.


2. विजेची उपलब्धता

34 responses





3. इन्व्हर्टर आहे का?

34 responses





4.घरासमोरचा रस्ता


34 responses




पायाभूत सुविधा ह्या कोणत्याही गावच्या विकासासाठी आवश्यक असतात. मौजे वसगडे गावात ९४.१ % कुटुंबांच्याकडे सरकारी वीज कनेक्शन आहे. तर वीज गेल्यास सुरक्षेच्या दृष्टीने गावात ९७.१ % कुटुंबांना वीज

पुरवेल एवढ्या क्षमतेचे इंवर्टर आहे. ७३.५ % भागात सार्वजनिक रास्ते पक्के आहेत तर २६.५ % भागात सार्वजनिक रास्ते कच्च्या स्वरूओत आहेत.








शौचालये सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने महत्वाची असतात. सर्व कुटुंबाकडे मौजे वसगडे गावात वैयक्तिक शौचालये आहेत.

### ३.१.४ . गावात विकास कार्यक्रमांची उपलब्धता आणि पोहोच


1. तुम्ही कोणत्याही सरकारी कार्यक्रम/योजनेचा लाभ घेता का?

34 responses




2. घेत असल्यास, योजनेचे नाव

22 responses





3. घेत असल्यास, तुम्हाला या योजनेबद्दल कसे कळले:

34 responses




4. योजनेचा लाभ घेण्यामध्ये अडचणी येतात का?

32 responses




5. सरकारी योजनेचा लाभ घेण्यात येणाऱ्या अडचणी


34 responses




मौजे वसगडे गावातील सुमारे ६४.७% कुटुंब म्हणतात की आम्ही सार्वजनिक योजनेचा लाभ घेत नाहीत. तर ३५.३ % कुटुंब सरकारी योजनेचा लाभ घेतात.जनधन योजना,पी. एम. किसान सन्मान योजना, लाल बावटा योजना आणि रंजीव गांधी योजना इ. सरकारी योजनाचा लाभ मौजे वसगडे गावच्या कुटुंबांनी घेतला आहे. २६.५ % कुटुंब म्हणतात की सरकारी योजणेबादळ आवश्यक आमहिती मिळत नाही.


6. एनजीओ/बचत गट/सामाजिक संघटना यांमध्ये सहभाग

34 responses





7. एनजीओ/ बचत गट / सामाजिक संघटनाचे नाव

24 responses




9. एनजीओ/बचत गट/सामाजिक संघटना यामुळे कौटुंबिक सामाजिक/आर्थिक परिस्थिती सुधारण्यात हातभार लागतो का?

32 responses



मौजे वसगडे गावातील ५५.९ % कुटुंबातील महिलांचा महिला बचत गटात सक्रिय सहभाग आहे. त्यामध्ये निशिगंध महिला बचत गट , महालक्ष्मी , कलावती , पंचशील स्वयं सहाय्य , वसुंधरा , गुरुमाऊली आदि महिला बचत गटांत सहभागी आहेत. त्यातील ५९.४ % महिलांची सामाजिउक आणि आर्थिक सतिथी महिला बचत गटांमुळे सुधारली आहे.

### ३.१.५ . ग्रामीण बदलासाठी लोकांच्या अपेक्षा


1. गावात  कोणत्या क्षेत्रात सुधारणा व्हाव्यात असे तुम्हाला वाटते? (लागू होणारे सर्व निवडा):

34 responses




2. गाव सुधारणेसाठी टिप्पण्या किंवा सूचना

34 responses




मौजे वसगडे गावातील सुमारे ३२ कुटुंबांचा नमूना चाचणी घेतली गेली.त्यापैकी ३५.५% कुटुंबांना असे वाटते की उछ शिक्षण सुविधा ,२३.५ % कुटुंबांना वाटते की पायाभूत सुविधा (रस्त,अतिक्रमण हटाव) हव्यात तर १७.६ % कुटुंबांना वाटते की रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात.

## प्रकरण चौथे

## सारांश/निष्कर्ष

**"वसगडे गावच्या सामाजिक,आर्थिक आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास"** केल्यानंतर प्रस्तुत संशोधक पुढील निष्कर्षा पर्यंत येऊन पोहचतो.

१. मौजे वसगडे गावचे स्त्री (३९८९) -पुरुष(४१७६) प्रमाण विषम आहे.
२. मौजे वसगडे गावात चह शिक्षण घेणाऱ्यांचे परांमन अत्यल्प आहे. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाणही अत्यल्प आहे.
३. मौजे वसगडे गावात  सरकारी आरोग्य सुविधांचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे.
४. मौजे वसगडे गावात वीज,पाणी, दिवाबत्ती आणि शौचालये इ. पायाबहाऊत सुविधा समाधानकारक आहेत. तर रस्ते सुविधा तुलनेने कमी प्रमाणात आहे.

## प्रकरण पाचवे

## संदर्भ सूची


1. Abrams, M. Social Surveys and Social Action, London, 1951.

2. Goode, W. J.; Hatt, P. K. Methods in Social Research, New York, 1952.

3. Hansen, M. H.; Hurwitz, W. N.; Madow, W. C. Sample Survey Methods and Theory, 2 Vols., New York, 1953.

4. Hyman, H. H. Survey Design and Analysis, Illinois, 1955.

5. Mahalonobis, P. C. Recent Experiments in Statistical Sampling in the Indian Statistical Institute, 1946.

6. Moser, C. A. Survey Methods in Social Investigation, London, 1958.

7. Payne, S. L. The Art of Asking Questions, Princeton, 1951.

8. Sukhatme, P. V. Sampling Theory of Surveys with Applications, Iowa, 1954.

9. Yates, F. Sampling Methods for Censuses and Surveys, London, 1953.

१०. चापेकर, ना. गो. बदलापूर (आमचा गाव), पुणे, १९३३.

# अनुसूची

## I.प्रश्नावली

"Education for Knowledge, Science and Culture."
– Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR** (Autonomous)
**Department of Political Science**

.........................................................................................................

**(CEP)**

**मौजे वसगडे गावाचा सामाजिकी-आर्थिक परिस्थिती आणि विकास प्रक्रियेचा अभ्यास**

**कुटुंबांचे सर्वेक्षण**

### विभाग 1: लोकसंख्याशास्त्रीय माहिती

1. घर क्रमांक: ………………………………………………………………………..
2. घरातील एकूण सदस्य संख्या: ……………………………………………………….
4. एकूण प्रौढांची संख्या (18 वर्षे आणि त्यावरील): ……………………………………….
5. एकूण मुलांची संख्या (18 वर्षाखालील): ……………………………………………
6. एकूण महिलांची संख्या:…………………………………………………………….
7. एकूण पुरुषांची संख्या:……………………………………………………………….

### विभाग २: शिक्षण

1. घरच्या प्रमुखाचे शिक्षण:
   अ) औपचारिक शिक्षण नाही

ब) प्राथमिक शाळा (१-४ वी इयत्ता)
क) माध्यमिक शाळा (५-१0 वी इयत्ता)
ड) उच्च माध्यमिक (११-१२ वी इयत्ता)
इ) पदवीधर किंवा त्याहून अधिक
फ) पदव्युत्तर

2. घरातील प्रौढ स्त्रीचे उच्च शिक्षण:
अ) औपचारिक शिक्षण नाही
ब) प्राथमिक शाळा (१-४ वी इयत्ता)
क) माध्यमिक शाळा (५-१0 वी इयत्ता)
ड) उच्च माध्यमिक (११-१२ वी इयत्ता)
इ) पदवीधर किंवा त्याहून अधिक
फ) पदव्युत्तर

3. शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांची संख्या:
अ) काहीही नाही
ब) १
क) २
ड) 3 किंवा अधिक

4. शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलींची संख्या:
अ) काहीही नाही
ब) १
क) २
ड) 3 किंवा अधिक

5. व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची संख्या:
अ) काहीही नाही
ब) १
क) २
ड) 3 किंवा अधिक

**विभाग 3: आरोग्य**

6. जवळच्या आरोग्य सुविधा केंद्रापर्यंतचे अंतर (किलोमीटरमध्ये):
अ) १ किमी पेक्षा कमी
ब) १-५ किमी

क) ६-१० किमी
ड) १० किमी पेक्षा जास्त

7. आरोग्य सुविधा केंद्राच्या वैद्यकीय सेवांचे आणि औषधांच्या उपलब्धतेचे मूल्यांकन कसे कराल?
अ) उत्कृष्ट
ब) चांगले
क) गोरा
ड) गरीब

8. तुम्ही ज्या दवाखान्याला अधिक वेळा भेट देता त्या ठिकाणी खालीलपैकी कोणती सेवा उपलब्ध आहे ?
अ) डॉक्टरांचा सल्ला
ब) बालरोग काळजी
क) माता काळजी (जन्मपूर्व, जन्मानंतर)
ड) आपत्कालीन सेवा

9. तुम्हाला किंवा कुटुंबातील कोणत्याही सदस्याला मागील वर्षात खालीलपैकी कोणत्याही कारणामुळे वेचा लाभ घेण्यात अडचणी आल्या आहेत का?
अ) वाहतुकीचा अभाव
ब) आर्थिक अडचणी
क) दीर्घ प्रतीक्षा वेळ
ड) वरीलपैकी काहीही नाही

10. घरातील सदस्यांना भेडसावणाऱ्या सामान्य आरोग्याच्या समस्या:
अ) काहीही नाही
ब) संसर्गजन्य रोग
क) जुनाट आजार (उदा., मधुमेह, उच्च रक्तदाब)
ड) इतर (कृपया निर्दिष्ट करा) ____________

**विभाग 4: गावातील मूलभूत सुविधा**

11. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता:
अ) होय, घरी नळ आहे
ब) होय, परंतु सार्वजनिक नळ
क) नाही

12. विजेची उपलब्धता:
अ) 24 तास

ब) १२-१८ तास

क) 6-12 तास

ड) 6 तासांपेक्षा कमी

13. रस्ते आणि वाहतुकीची स्थिती :

अ) खराब

ब) सरासरी

क) चांगले

ड) उत्कृष्ट

13. घराच्या आवारात टॉयलेट आहे का?

1. होय
2. नाही

14. तुम्ही खालीलपैकी काय वापरता का:

अ) खाजगी शौचालय

ब) सामुदायिक शौचालय

क) सार्वजनिक स्वच्छतागृह

**विभाग 5: गावात विकास कार्यक्रमांची उपलब्धता आणि पोहोच**

15. तुम्ही कोणत्याही सरकारी कार्यक्रम/योजनेचा लाभ घेता का?

अ) होय

ब) नाही

16. योजनेचे नाव: ……………………………………………………….

17. तुम्हाला या योजनेबद्दल कसे कळले:

अ) सरकारी जाहिरात

ब) ग्रामसेवक/पंचायतीद्वारे थेट संवाद

क) इतर (कृपया निर्दिष्ट करा) _____________

18. सरकारी योजनेचा लाभ घेण्यात येणाऱ्या अडचणी:

अ) अंतर

ब) माहितीची कमतरता

क) प्रशासकीय अडथळे

ड) इतर (कृपया निर्दिष्ट करा) _____________

19. एनजीओ/सामुदायिक कार्यक्रमांमध्ये सहभाग:

अ) होय

ब) नाही

सामुदायिक कार्यक्रमाचे नाव: ………………………………………

20. सामुदायिक कार्यक्रमाच्या फायद्याचे मूल्यांकन कसे कराल?

अ) उत्कृष्ट

ब) चांगले

क) गोरा

ड) गरीब

**भाग 6: बदलासाठी लोकांच्या अपेक्षा**

21. गावात कोणत्या क्षेत्रात सुधारणा व्हाव्यात असे तुम्हाला वाटते? (लागू होणारे सर्व निवडा):

अ) उत्तम शिक्षण सुविधा

ब) सुधारित आरोग्य सेवा

क) सुधारित पायाभूत सुविधा (रस्ते, वीज)

ड) कौशल्य विकास कार्यक्रम

इ) रोजगाराच्या संधी

फ) इतर (कृपया निर्दिष्ट करा) _____________

विभाग 7: अतिरिक्त माहिती:

23. गाव सुधारणेसाठी टिप्पण्या किंवा सूचना: ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

सर्वेक्षण करणाऱ्यांची सही